बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि. २० मार्च २०२३

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १६ /२०२३ भादवि ४२०,सह माहिती तंत्रज्ञान अधि क ६६ (ड) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०६/०३/२०२३ ते दि ०८/०३/२०२३ रोजी दरम्यान फिर्यादीचे राहते घरातून,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २०/०३/२०२३ रोजी |
| **फिर्यादीचे नाव** | : | रवि दत्तात्रय श्रीराम,वय-३१ वर्षे,रा- प्लॉट नं ३६,व्यंकटेश नगर अंबाबाई मंदिरजवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) https://T.ME./Aman ७७५८ वापरत असलेला इसम,२) SKY TECH SOLUTION हा नाव वापरत असलेला इसम.३) devinder kumar हे नाव वापरत असलेला इसम.४) mohmmad shafi हा नाव वापरत,५) mukul kumar हा नाव वापरत असलेला इसम.६) sujaltnayak हा नाव वापरत असलेला इसम,७) सुत्रा HR प्रा लिमिटेडया टेलिग्राम. |
| **फसवणुक र** | | **४,३८,०००/- रूपये-** |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि २७/०२/२०२३ रोजी सकाळी ११.४६ वा चे सुमारास फिर्यादीचे मोबाईल व्हॉटसअप वर सुत्रा HR प्रा लिमिटेडया या नावाचे कंपनीचे मोबाईल क्र ८८३७३९१०७१ वरून मेसेज आला की तुम्ही सोशल मिडीयावर इन्स्टाग्रामवरील सेलिब्रेटीला फोलो केला तर तुम्हाला पैसे मिळतील त्यामुळे फिर्यादीने होकार दिला एका इन्स्टाग्रामवरील सेलिब्रेटीला फोलो केल्यानंतर ३० रूपये मिळतील दर दिवशी २५ टास्क पुर्ण केले तर ३५०/- रूपये मिळतील अशी चॅटिंग झालेली होती, त्यानंतर काहिवेळाने https://T.ME./Aman ७७५८ ही लिंक येवून त्यामध्ये https://www.instngram.com/shafaqnaaz७७७ या इन्स्टाग्रामवरील सेलिब्रेटीला फॉलो करण्यास सांगितले त्यामुळे फिर्यादीने त्याला फॉलो केले होते, त्यानंतर पुन्हा काहीवेळाने https://www.instngram.com/rukshardhillon१२/ या इन्स्टाग्रामवरील सेलिब्रेटीला फॉलो करण्यास सांगितले त्यामुळे फिर्यादीने त्याला फॉलो केले तेव्हा तुम्ही दोन टास्क पुर्ण केले असल्याचे मेसेज आला त्यानंतर पुन्हा https://T.ME./Aman ७७५८ ही लिंक येवून टेलीग्राम ग्रुप जॉईन करणेस सांगितले तेव्हा फिर्यादीने तो ग्रुप जॉईन केला.त्यानंतर २१० रूपये हे फिर्यादीचे पेटिएम पेमेंट बॅक खाते क्र ९१९५७९५०६२६२ यावरती जमा करून फिर्यादीचा विश्वास संपादन करून घेतला.<br>त्यानंतर दि ०६/०३/२०२३ रोजी फिर्यादीस अजून एक टास्क देण्यात आला त्यामध्ये फिर्यादीने mukul kumar हा नाव वापरत असलेला इसमाचे खात्यावर ३५ हजार रूपये भरले, त्यामोबदल्यात काहीऐक पैसे फिर्यादीस मिळाले नाही म्हणून https://T.ME./Aman ७७५८ यास विचारणा केली असता त्यांनी पुन्हा एक टास्क देण्यात येईल व ६५ हजार भरा असे सांगितले, त्यामुळे फिर्यादीने mohmmad shafi हा नाव वापरत असलेल्या इसमाचे खांत्यावर पैसे भरले असता एक ही रक्कम परत न मिळाल्याने फिर्यादीने परत https://T.ME./Aman ७७५८ यास विचारणा केली असता त्यांनी तुम्हाला दुसऱ्यादिवशी रक्कम देण्यात येईल असे सांगितले.<br>दि ०७/०३/२०२३ रोजी फिर्यादीस पुन्हा एक टास्क पुर्ण करण्यास सांगितले त्यामध्ये १,३८,०००/- रूपये भरण्यास सांगितले, असता फिर्यादीने devinder kumar हे नाव वापरत असलेला इसमाचे खात्यावर १,२९,०००/- रूपये भरले त्यानंतर त्यांनी मला टेलीग्रामव्दारे https://T.ME./Aman ७७५८ यांनी सांगितले की तुम्ही चुकीची ऑर्डर केली असल्याचे सांगितले परत पुन्हा तुम्हाला एक टास्क देण्यात येईल असे सांगितले,<br>दि ०८/०३/२०२३ रोजी टेलिग्रामवरून मेसेज करून १,९५,०००/- रूपये भरण्यास सांगितले असता फिर्यादीने sujaltnayak हा नाव वापरत असलेला इसमाच्या खात्यावर भरली फिर्यादीने परत https://T.ME./Aman ७७५८ यास माझे पैसे कधी देणार याबाबत विचारणा केली असता त्यांनी तुमचे क्रेडिट स्कोर कमी असून तुम्हाला परत ५८,०००/- रूपये भरावे लागतील असे सांगितले त्यामुळे फिर्यादीस त्यांचेवर संशय आला म्हणून फिर्यादीने सदरचे पैसे भरले नाहीत अशा प्रकारे फिर्यादीची वरील आरोपीताकडून आर्थिक फसवणूक झाली आहे. म्हणून. तपास:- दुपोनी दराडे-८३९००९००९९ |